# राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ

(सेंट्रल प्रोव्हिन्सेस शासन शिक्षण विभागाची अधिसूचना क्रमांक ५१३ दिनांक १ ऑगस्ट, १९२३ द्वारा स्थापित व महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम, २०१६ (सन २०१७ चा महाराष्ट्र विद्यापीठ अधिनियम, क्रमांक ६) द्वारा संचालित राज्य विद्यापीठ)

(विद्या विभाग)

छत्रपती शिवाजी महाराज प्रशासकीय परिसर, रविन्द्रनाथ टागोर मार्ग, नागपूर – ४४० ००१.

दूरध्वनी क्रमांक: कार्यालय: ०७१२–२५३२०६३ फॅक्स : ०७१२–२५५५७०१


क्र. रातुमनावि/विद्या/१८/ ८२०  दिनांक २४ सप्टेंबर २०१८

## :: अधिसूचना ::

सर्व संबंधीतांच्या माहितीकरीता सुचित करण्यात येते की, वाणिज्य व प्रबंधन विद्याशाखेअंतर्गत येणारे बी कॉम अभ्यासक्रमाचे निर्देश व परिक्षा योजनेस वाणिज्य व प्रबंधन विद्याशाखे अंतर्गत येणाऱ्या सर्व अभ्यासमंडळाचे मा. अध्यक्ष आणि मा. अधिष्ठाता, वाणिज्य व प्रबंधन विद्याशाखा यांच्या शिफारशीला मान्य करून मा. कुलगुरू महोदयांनी महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(७) अंतर्गत सर्व अभ्यासमंडळ, वाणिज्य व व्यवस्थापन विद्याशाखा, विद्वत परिषद आणि व्यवस्थापन परिषदेच्या वतीने दिनांक १८/०९/२०१८ रोजी मान्यता प्रदान केलेली आहे. तसेच बी.कॉम. अभ्यासक्रमाचे निर्देश व परीक्षा योजना कार्यान्वीत करण्याकरीता महाराष्ट्र सार्वजनिक विद्यापीठ अधिनियम २०१६ च्या कलम १२(८) अंतर्गत निर्देश क्र १७/२०१८ दिनांक १८.०९. २०१८ रोजी सत्र २०१८–२०१९ पासून विद्वत परिषद आणि व्यवस्थापन परिषदेच्या वतीने लागू करण्यात येत आहे.

करीता बी.कॉम. पदवी अभ्यासक्रमाचे निर्देश व परिक्षा योजना संबंधितांना माहीती व अंमलबजावणीस निर्गमित करण्यात येत असून, महाविद्यालय/विभाग/संस्थेतील सर्व शिक्षक व विद्यार्थ्यांच्या सुविधेकरिता राष्ट्रसंत तुकडोजी महाराज नागपूर विद्यापीठ, नागपूर www.nagpuniversity.org या संकेतस्थळावर उपलब्ध करण्यात आलेले आहे.

कृपया संबंधीतानी नोंद घ्यावी

मा.कुलगुरूंच्या आदेशान्वये

(श्री. निरज खटी)
कुलसचिव(अति.प्रभार)